# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०१/२००७

आज दि. २०/०१/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १० दि. १०/०१/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ७) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ९) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १०) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ११) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १२) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १३) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १४) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १५) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १६) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २१) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| २२) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| २५) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| २६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| २७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २८) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| २९) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३०) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ३१) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३२) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३३) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ३४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ३५) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ३६) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ३७) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ३८) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ३९) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४०) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४१) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४२) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४३) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४४) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ४५) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४६) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ४७) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ४८) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ४९) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५०) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५१) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५२) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५३) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५४) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५५) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ५६) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| २) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ६) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ७) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| ८) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| ९) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| १०) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| ११) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| १२) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| १३) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| १४) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| १५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| १६) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| १७) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| १८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १९) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| २०) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| २१) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| २२) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| २३) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| २४) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| २५) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज दिलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| २) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ३) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, सभेला सुरूवात करा.

**नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रगीतासाठी आपल्या जागेवर उभे रहायचे आहे.

(''वंदे मातरम'' राष्ट्रीयगिताने सभेला सुरूवात करण्यात आली. )

**मा. महापौर :-**

दि. २० जानेवारी २००७ ची मा. महासभा सर्वांना नमस्कार, महानगरपालिकेत या सभेला उपस्थित असलेले शहराचे उपमहापौर चंद्रकांत वैतीजी, मा. आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, उपस्थित असलेले सभागृहनेते हॅरल बोर्जीस साहेब, तसेच विरोधी पक्षनेता परशुराम पाटील साहेब, स्टँडिंग कमिटीचे सभापती स्टिवन मेंडोसा साहेब, सभागृहात उपस्थित असलेले सर्व पक्षाचे गटनेते, नगरसेवक, नगरसेविका, प्रेक्षक गॅलरित उपस्थित असलेले बंधु भगिनिंनो, पत्रकार गॅलरित उपस्थित असलेले सर्व पत्रकार . आजची सभा परिवहन सदस्यांच्या निवडीबद्दल बोलावलेली आहे. तर, आपण सर्वांनी सदस्यांची निवड करुन. खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पाडण्यास सहकार्य करावे. धन्यवाद. '' जय हिन्द, जय महाराष्ट्र. ''

(नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १०९ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

महानगरपालिका परिवहन समितीच्या एकुण सहा सदस्यांकरिता निवडणूक कार्यक्रम दि. १६/०१/२००७ पासुन जाहिर करण्यंत आला होता. दि. १६/०१/२००७ रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करणेच्या वेळी एकुण आठ उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली होती. दि. १७/०१/२००७ रोजी छाननीवेळी सर्व नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे दिसुन आले होते. दि. १८/०१/२००७ रोजी उमेदवारी मागे घेण्याच्यावेळी श्री प्रशांत पालांडे यांनी आपली उमेदवारी मागे घेतली होती. सहा जागांकरिता एकुण ७ उमेदवार शिल्लक राहील्याने निवडणूक घेणे क्रमप्राप्त आहे. परंतु सभा नियमानुसार प्रत्यक्ष निवडणूकीस सुरवात होणे अगोदर उमेदवार आपली उमेदवारी मागे घेउ शकतात व त्याप्रमाणे आजची सभा सुरु झालेली आहे तरी मा. पिठासिन अधिकाऱ्यांस विनंती की त्यांनी उमेदवारी मागे घेण्याकरिता उमेदवारांस वेळ द्यावी.

**मा. महापौर :-**

उमेदवारी मागे घेण्यासाठी ५ मिनिटाचा अवधी देण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम, यांनी ५ मिनिटाचा अवधी दिला होता. त्या दरम्यान एक उमेदवारी मागे घेण्यासाठी अर्ज आलेला आहे. श्री. सुरेश यशवंत भोईर यांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे. त्यांचा अर्ज सुचक व अनुमोदक यांनी सादर केलेला आहे. परिवहन समितीकरिता एकुण सहा सदस्य निवडायचे होते. आता ह्या उमेदवारी मागे घेतल्यामुळे फक्त सहा उमेदवार शिल्लक राहिल्यामुळे निवडणूक प्रक्रिया घेण्याची आवश्यकता नाही. मी, मा. महापौर मॅडम, यांना विनंती करतो की, जे सहा सदस्य शिल्लक राहिलेले आहे. त्यांची परिवहनचे सदस्य उर्वरित काळाकरिता निवडून आले असे घोषित करावे अशी मी त्यांना विनंती करतो.

**मा. महापौर :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (२) अन्वये मा. परिवहन समिती सदस्य खालील प्रमाणे निवडून आलेले आहेत. ते मी घोषित करत आहे. १) अमर कलानी राउत २) अशोक सुर्यदेव तिवारी ३) गुलाम मुस्तफा अब्दुल वाहब पटेल ४) राजेश हरिचंद्र परब ५) रेनॉल्ड गिल्बर्ट बेचरी ६) श्यामराव शिवराम मदने हे सदस्य परिवहन समितीवर निवडून आलेले आहेत. असे मी घोषित करत आहे.

**प्रकरण क्र. १०९ :-**

मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(२) अन्वये मा. परिवहन समितीच्या रिक्त होणाऱ्या सहा (६) सदस्यांच्या जागी नवीन (सहा) सदस्यांच्या नेणमुकीकरिता.

**ठराव क्र. ८५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २५(२) अन्वये मा. परिवहन समितीचे ०६ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत :-

१) श्रीम. उमा श्याम पाटील
२) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
३) श्री. अशोक तिवारी
४) श्री. रेनॉल्ड बेचरी
५) श्री. प्रशांत पालांडे
६) श्री. श्याम मदने

वरील निवृत्त होणारे सदस्यांच्या जागी नवीन सहा सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २५(२) अन्वये निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस सदस्यांची नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण ०८ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस (१) श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे ह्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे ०७ सदस्य शिल्लक राहिले. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर (१) श्री. सुरेश यशवंत भोईर ह्यांनी माघार घेतल्यामुळे ०६ उमेदवार शिल्लक राहिले. मा. परिवहन समिती सदस्य पदी ०६ (सहा) सदस्यांची निवड करावयाची असल्याने व सहा उमेदवार शिल्लक राहिल्याने मा. परिवहन समिती सदस्य या पदाकरिता **(१) श्री. अमर कलानी राउत, (२) श्री. अशोक सुर्यदेव तिवारी, (३) श्री. गुलाम मुस्तुफा अब्दुल वहाब पटेल, (४) श्री. राजेश हरिश्चंद्र परब, (५) श्री. रेनॉल्ड गिल्बर्ट बेचरी, व (६) श्री. श्यामराव शिवराम मदने** ह्या सदस्यांची बिनविरोध निवड झाल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम, यांनी घोषित केल्यामुळे जे सदस्य निवडून आलेले आहे. त्यांना मी डायसवर बोलावतो. आणि मा. महापौर मॅडमच्या हस्ते पुष्पगुच्छ देउन त्यांचा सत्कार करतो. कृपया जे सदस्य सभागृहात किंवा बाहेर उपस्थित असतील त्यांची नावे घेतल्यानंतर आतमध्ये यायचे आहे.

(सहा सदस्यांना मा. महापौर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.)

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, मुझे २ मिनीट बोलनेका मौका दिया जाये। मैं आज अपने ५ साल के अंतिम समापन के तरफ बढ रहे है। यह चुनाव प्रक्रीया के बारेमें सभी नगरसेवकोंको धन्यवाद प्रस्ताव देना चाहता हुँ। साथ में सभी पार्टीयों को ५ साल में जिस तरहसे महानगरपालिकामें चुनाव हुए है। इस परिषद के ठाणे जिल्हा के दुसरी नगरपालिकाओंमें इस तरह के चुनाव नही हुए। आप आज कल परसो के पेपर पढीए। कही ना कही नगरपालिकाओंमे किसीना किसी तरह की परेशानियाँ और तकलीफोसें पद पुरी तरह से उनकी निर्वाचित नही हो पाते, प्रॉब्लेम्स होती है। मै इसलिए खडा हुआ की, सभी पार्टीयोंके जो कम नगरसेवक थे। जिनके कम नगरसेवक थे। जिन्होंने दुसरी पार्टीओ को जॉईंट किया। बडे शांत प्रक्रियासे उन्होंने जॉईंट किया। कही भी प्रॉब्लेम नही हुई। भारतीय जनता पार्टी है। कॉंग्रेस पार्टी है जिन्होंने काफी लोगो को आकर्षित किया। दुसरोसे बुला लिया। अपने आपका ग्रुप बढा लिया फिर बादमें एक दल में एक ही आदमी रह गया। दो लोग इधर - उधर चले गये। राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिसके ३० नगरसेवक थे। और अब शिवसेनाने जो उदाहरण पेश किया है। हालाकी गलती की, तीन लोगों को लिया उसके बाद सन्मा. सदस्य रतन पाटील और अनंत पाटील अनको कहना चाहिए की, पुराने नगरसेवकोंने ऐसा उदाहरण पेश किया की दो लोगो का नाम वापस लेके सभा का समय खराब नही किया। राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी के ३० नगरसेवक चुनके जिस पार्टी के आए। २००२ से ले के २००७ तक एक भी नगरसेवक ने कही दुसरी पार्टी पे गलत नजर नही डाली। दुसरी पार्टी के तरफ जाने की इच्छा नही की। हमारे पार्टी के जो लिडर थे मा. गिल्बर्टजी मेन्डोसा साहब, मै उनका अभिवादन करना चाहता हूँ की उनकी डायरेक्शन से एक भी चुनाव कभी गलत नही हुआ। आप ठाणा देखिए, भिवंडी देखिए, उल्हासनगर देखिए। सुबह से शाम तक उनके हाउस की चर्चा आती है। यह एक अभिमान की बात है। आप सब नगरसेवक की पत्रकार के द्वारा किसी भी पार्टी की इतनी बदनामी नही हुई की जैसे भिवंडी के नगरसेवको की हुई है। उल्हासनगर के नगरसेवकोंकी हुई है। मैं एन्. सी. पी. के नगरसेवकों को धन्यवाद देता हूँ। हम सब लोग साडे चार साल से समापन के तरफ बढ रहे है। यह प्रोग्राम अवश्य होना है। की, इस हाउस में इस नगरसेवक ने अच्छा बरताव किया। कौन किसके पार्टी के लिए ज्यादा देर तक स्वामी भक्त रहा। अपने पार्टी में कौन ज्यादा अच्छा काम किया। मेरा, मा. महापौर, मा. उपमहापौर इनसे निवेदन है की, आप इस तरह का प्रोग्राम लगाईए की जिसे बहोत से नगरसेवक ऐसे है की, जिन्होंने गलत व्यवहार किया हो। वो आगे के लिए सुधर जाए। लेकिन मैं आज सभी नगरसेवक को धन्यवाद देना चाहता हूँ। हमारे पार्टी के मा. गिल्बर्ट मेन्डोसा साहबने बहोत अच्छी तरह से डायरेक्शन दिया। और ५ सालमें दो पद मा. महापौर के, ३ पद स्टँडींग कमिटीके और बाकी सारे पदो में कही भी टकराव ना होके ऐसे हम ५ साल पुरी करने के तरफ आगे बढ चुके है। और मैं फिर से एकबार सारे हाउस के नगरसेवक बोलने वाले और न बोलने वाले को भी धन्यवाद देता हूँ। यह प्रवृत्ती बनाए रखीए। चार महिने में आप अपने मिरा भाईंदर का रेकॉर्ड स्थापित करिए। पत्रकारोंसेभी पुछीए। कम्पेअर टू अदर नगरपालिका आप हंड्रेड टाईम बेटर है, बेटर है, बेटर है।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता चौहान साहेबांनी सर्व पार्टीचे विवरण केलेले आहे. कुठली चांगली पार्टी किंवा कुठे काय कमी जास्त झाले. परंतु, मी मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये बोलायला इच्छुक आहे की, मिरा भाईंदरला सेटींग जबरदस्त असते. म्हणजे निवडणूका लागत नाही. सेटींग ने पार पाडते. त्याच्याबद्दल या सभागृहाचा मी धन्यवाद करते. कारण, शिवसेना असु दे, जनता दल असु दे, बि. जे. पी. असु दे, कॉंग्रेस असु दे किंवा राष्ट्रवादी असु दे बंडखोर उमेदवार असतात. फॉर्म सुद्धा भरतात. परंतु, पार्टीचे अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या हस्तक्षेप मध्ये ते मान्य करुन उमेदवारी पद मागे घेतात. मला त्याच्यामध्ये असे वाटते की, ह्यांनी उमेदवार जे स्वतःचे पद परत घेतले. आणि पार्टीची इज्जत ठेवली. त्यांचे आपल्याला धन्यवाद अदा करायला पाहिजे. जय हिन्द.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी समारोप करणार नाही. कारण, मला ५ वर्षासाठी निवडणून पुन्हा यायचे आहे. परंतु, एक गोष्ट मी नक्की सांगतो की, या सभागृहात कोणी वाईट बोलले आहे किंवा वाईट बोलण्याची ज्याची प्रगती असेल. किंवा कधी कधी माणूस बोलत नाही. पण, एखादा महान असा क्रिएट होतो. त्यामुळे काही अपशब्द त्यांच्याकडून निघतात. म्हणून सरळ गोष्टीला इश्वरी क्षमा देतो. तर, सभागृह तर नक्कीच सर्वांना क्षमा करणार आहे. याच्यात दुमत नाही. एक गोष्ट चौहाणसाहेबांनी सांगितले कुछ लोग गये, कुछ लोग गये पण माझ्या पक्षासाठी मी एवढ सांगणार आहे की, आमच्यापक्षात १९९२ साली ३ नगरसेवक निवडून आले. १९९७ साली ती संख्या ९ वर गेली आणि २००२ साली ती संख्या १५ वर गेली. आणि पुढच्या महापालिकेत आमचे महापौर नक्की होणार आहे. आणि सन्मा. सदस्य चौहान साहेबांना आणि सभागृहातील सर्व सदस्यांचा पाठींबा भाजपला राहतो आणि यापुढे ही पाठिंबा राहील.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने बोलतो, प्रथम सन्मा. सभागृहाचे मी अभिनंदन करतो. आणि धन्यवाद सुद्धा देतो. आजच्या निवडणूक प्रक्रियेवर जी प्रक्रिया झाली नाही. त्याबद्दल मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर साहेब, मा. आयुक्त साहेबयांचे मी प्रथम हार्दिक अभिनंदन करतो. सन्मा. सभागृह आज परिवहन समितीच्या संदर्भात जे सहा सदस्य निवडून आपल्याला पाठवायचे आहे आणि आज त्याची निवडणूक प्रक्रिया झाली सुद्धा. काही कारणास्तव आज सन्मा. सदस्यांचा वेळ थोडा फार वाया गेला. त्याबद्दल मी शिवसेनेच्यावतीने मी दिलगीरी व्यक्त करतो. आणि माफी सुद्धा मागतो. अशा पद्धतीने व्हायला नको. आज सभागृहामध्ये ज्या पद्धतीने साडेचार वर्षाचा जो कालावधी चाललेला आहे. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असे एकमेकाला सहकार्य करुन आपण हे सभागृह आजपर्यंत चालवत आलो. प्रत्येक वेळेला कुठल्याही प्रकारे निवडणूक न लढवता किंवा सभागृहावर निवडणूक न टाकता खेळीमेळीची वातावरणामध्ये आपण आपले सदस्य निवडून आणत आहोत आणि आज त्याप्रमाणे ही खेळीमेळीची निवडणूक न होता बिनविरोध झालेली आहे. सन्मा. कॉंग्रेस पक्ष, सन्मा. राष्ट्रवादी पक्ष, सन्मा. भाजप, सन्मा. आघाडी पक्ष व सन्मा. जनतादल पक्ष ज्या ज्या विभागाने आंम्हाला सहकार्य केलेले आहे. सन्मा. सर्व लोक प्रतिनिधीचे आम्ही हार्दिक शुभेच्छा देतो. आमचा सदस्य निवडून दिल्याबद्दल आभार प्रकट करतो '' जय हिंद जय महाराष्ट्र ''

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आता, परिवहन समितीचे सहा सदस्य निवडून आलेले आहे. त्या सर्व सभासदांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. तसेच आता जे काही वक्तव्य झाले. त्यामध्ये या शहराला एकतर मोरू भाउच्या विचाराचा आणि गिल्बर्ट शेटच्या विचारांची परंपरा लाभलेली आहे आणि पुढेसुद्धा हिच परंपरा अशीच चालू राहणार आहे. आता सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल जे काही महापौरांचे स्वप्न बघितले ते तर कदाचित त्यांना महापौराबद्दल फार काळ लागेल. आता तीन - तीन ने वाढत चाललेले आहे. पहिला सहा होते सहाचे नउ झाले. नउचे बारा झाले. बाराचे पंधरा झाले. आता, १५ चे १८ जास्तीत जास्त होतील. तर ही जी परंपरा गिल्बर्ट शेटची आणि मोरुभाउची आहे. हीच परंपरा कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीची चालू राहणार आहे. आणि महापौर हा त्यांचाच होणार आहे. असे सर्वांनी लक्षात ठेउन या पुढील निवडणूकीचा अहवाल असा मी करतो '' जय हिंद जय महाराष्ट्र.''

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अभी सन्मा. सदस्य चौहन साहबने बोला की, कुछ लोग इधर गये उधर गये। जो आपने लोगों को देखिए कौन कहाँ जा रहा है। उसका कोई किससे मतलब नही है। पहले आज अपने लोगों को देखना चाहिए। ओमप्रकाश साहबने बोला की हमारा महापौर होगा। इन्होंने बोला की आपका महापौर नही होंगे। मतलब क्या है? मुझे लगता है की आज लास्ट मिटींग है क्या? आज परिवहन का मिटींग है। जो भी परिवहन मे सदस्य चुने है उनको मैं अभिनंदन करता हूँ। हमारे मिरा भाईंदरके विकास के लिए सबने सबका साथ दिया। लेकीन जहाँ भी गलत काम हुआ उसका हमने विरोध किया। आगे भी गलत काम हुआ तो उसका विरोध करेंगे। और हमारा काम ही विरोधी पक्ष का है। अगर हमको कुछ भी गलत लगेगा की, आप गलत कर रहे है तो उसका विरोध हम जरुर करेंगे। फिर भी शहर के विकास के लिए हम हमेशा आपको सहयोग करते है। और करते रहेंगे। धन्यवाद।

**नगरसचिव :-**

कृपया राष्ट्रगितासाठी सर्वांनी जागेवर उभे रहायचे.

**(सभा संपल्याची वेळ दु.१२.१५ वा.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**